


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १३८ । किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । ०९/०६/२०२६ । पाने - ६




## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

### ज्येष्ठ शेतकरी रावसाहेब काकड यांचा जागीच मृत्यू



रावसाहेब काकड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - समृद्धी महामार्गावर सोमवारी (दि. ८ जून) पहाटेच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात अमृत ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेचे माजी व्हाइस चेअरमन तथा ज्येष्ठ शेतकरी रावसाहेब कारभारी काकड (वय ६५) यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत निवृत्त नायब तहसीलदार विनोद भागवत गिरी (वय ६१) आणि जेष्ठ कार्यकर्ते शरद नाना थोरात (वय ६०) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे संगमनेर तालुक्यात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रावसाहेब काकड, विनोद गिरी आणि शरद थोरात हे मुंबईहून संगमनेरकडे परतत होते. पहाटे सुमारे दोन वाजण्याच्या दरम्यान इगतपुरी-घोटी परिसरात समृद्धी महामार्गावर त्यांच्या वाहनाचा भीषण अपघात झाला. वाहनाचा टायर अचानक फुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन भरधाव वेगात रस्त्याबाहेर जाऊन अपघातग्रस्त झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की रावसाहेब काकड यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर महामार्गावरील आपत्कालीन यंत्रणा आणि स्थानिक मदतकार्य पथकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढले. त्यानंतर त्यांना तातडीने घोटी येथील एसएमबीटी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### शरद थोरात व विनोद गिरी जखमी

या दुर्घटनेत विनोद गिरी यांच्या कमरेला गंभीर दुखापत झाली असून शरद थोरात यांच्या खांद्याला मार लागला आहे. दोघांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. वाहन चालक आव्हाड हे देखील या अपघातात सुखरूप बचावले असल्याची माहिती समोर आली आहे. रावसाहेब काकड हे सामाजिक, सहकार आणि कृषी क्षेत्रातील एक आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. अमृत ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेचे माजी व्हाइस चेअरमन म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले होते. त्यांच्या अकस्मात निधनामुळे जोर्वे परिसरासह संपूर्ण संगमनेर तालुक्यात शोकाची भावना व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, रावसाहेब काकड यांच्या पार्थिवावर सोमवारी (दि. ८) सकाळी जोर्वे येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार आहे. या अपघाताबाबत संबंधित यंत्रणांकडून पुढील तपास सुरू असून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

## शेतकरी कर्जमाफी योजनेतील त्रुटी दूर करा - शरद पवार

युवावार्ता (प्रतिनिधी)

मुंबई - राज्यातील शेतकरी कर्जमाफी, वादळी पावसामुळे झालेले पिकांचे नुकसान आणि इंडिया आघाडीची आगामी रणनीती या महत्त्वाच्या मुद्द्यांवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत भूमिका स्पष्ट केली. राज्य सरकारच्या कर्जमाफी योजनेतील निकषांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना त्यांनी सरकारने शेतकऱ्यांशी संवाद साधून निर्णयात आवश्यक दुरुस्ती करावी, असा सल्ला दिला.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीबाबत अनेक शेतकरी संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. कर्जमाफीसाठी घालण्यात आलेल्या अटी आणि पात्रतेच्या निकषांमुळे मोठ्या संख्येने शेतकरी योजनेबाहेर राहतील, अशी टीका होत आहे. यावर प्रतिक्रिया देताना शरद पवार म्हणाले की, शेतकऱ्यांच्या तक्रारी गांभीर्याने घेण्याची गरज आहे. त्यांनी स्पष्ट केले की, सरकारचा निर्णय पूर्णपणे चुकीचा आहे असे म्हणणे योग्य नाही. मात्र त्यामध्ये काही व्यावहारिक अडचणी आहेत. त्यामुळे हा निर्णय थेट फेटाळण्याऐवजी त्यातील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कर्जमाफीबाबत स्वतः पुढाकार घेणार असल्याचे संकेतही पवारांनी दिले. ते म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि देशातील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून कर्जमाफीतील निकषांमध्ये सुधारणा करता येते का, याचा प्रयत्न केला जाईल. राज्यातील अनेक शेतकरी संघटना कर्जमाफीच्या निकषांवर नाराज असल्याने पवारांची ही भूमिका सरकारवरील दबाव वाढवणारी ठरू शकते.



गेल्या काही दिवसांत राज्यातील अनेक भागांत वादळी वारे आणि अवकाळी पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः उत्तर महाराष्ट्रातील केळी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. याबाबत बोलताना शरद पवार यांनी सांगितले की, त्यांच्याकडे नुकसानाचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे. विशेषतः केळी आणि ऊस पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी तज्ज्ञांची टीम पाठवण्यात आली होती. त्या पथकाचा अहवाल आता प्राप्त झाला असून त्याचा अभ्यास करून पुढील भूमिका निश्चित केली जाणार आहे.

(पान ४ वर)

## प. पू. गगनगिरी महाराज सप्ताहाच्या मिरवणुकीने परिसर दुमदुमला

### कलशधारी महिला, टाळ मृदूंगाचा निनाद, फटाक्यांची आतषबाजी, नामस्मरणाच्या जयघोषाने सप्ताहाला प्रारंभ







युवावार्ता (प्रतिनिधी)संगमनेर-

अधिकमासाच्या पावन पर्वानिमित्त गुंजाळवाडी येथे सोमवार दि. ८ जूनपासून सुरू होत असलेल्या परमपूज्य श्री स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाच्या शुभारंभाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात रंगून गेला. हजारो भाविकांच्या उपस्थितीत काढण्यात आलेल्या भव्य आणि दिव्य मिरवणुकीमुळे गुंजाळवाडीसह परिसरात भक्ती, श्रद्धा आणि नामस्मरणाचा अखंड गजर दुमदुमला.

सप्ताह मार्गावर उभारण्यात आलेल्या आकर्षक स्वागत कमानी, सर्वत्र डौलाने फडकणाऱ्या भगव्या पताका, रांगोळ्यांनी सजलेले रस्ते आणि विठ्ठल... विठ्ठल... च्या अखंड जयघोषाने संपूर्ण वातावरण अध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेले होते. प्रत्येक भाविकाच्या चेहऱ्यावर भक्तीचा आनंद आणि स्वामींच्या चरणी असीम श्रद्धा दिसून येत होती.

संगमनेर बसस्थानक परिसरातील दत्त मंदिरापासून सकाळी साडेदहा वाजता मिरवणुकीस प्रारंभ झाला. (पान २ वर)










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा

- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग

सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33

पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# नामस्मरणाचा महामेळा : संगमनेरच्या भूमीत अवतरणारा
# प.पू. स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह 2026

महाराष्ट्राची ओळख केवळ गड-किल्ले, शौर्य आणि इतिहासापुरती मर्यादित नाही. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा खरा आत्मा जर कुठे वसलेला असेल, तर तो संतांच्या विचारांमध्ये, वारकरी परंपरेमध्ये आणि हरिनामाच्या अखंड गजरामध्ये आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानाचा दीप प्रज्वलित केला, संत तुकाराम महाराजांनी भक्तीची गाथा घराघरात पोहोचवली आणि असंख्य संतांनी समाजाला अध्यात्माच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा दिली. याच महान संतपरंपरेतील एक तेजस्वी अध्यात्मसूर्य म्हणजे परमपूज्य श्री स्वामी गगनगिरी महाराज.

स्वामी गगनगिरी महाराजांचे संपूर्ण आयुष्य हे साधना, तपश्चर्या, योगविद्या, निसर्गप्रेम आणि मानवसेवा यांना समर्पित होते. त्यांनी केवळ अध्यात्माचा उपदेश केला नाही, तर स्वतःच्या जीवनातून त्याचे उदाहरण घालून दिले. महाराजांच्या विचारांचा प्रभाव आजही लाखो भक्तांच्या जीवनात जाणवतो. त्यांच्या कृपाशीर्वादाने आणि प्रेरणेने संगमनेर परिसरात सुरू झालेली अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा आज एक भव्य आध्यात्मिक चळवळ बनली आहे.

यंदा दि. ८ जून ते १५ जून २०२६ या कालावधीत श्रीक्षेत्र राजापूर रोड, गुंजाळवाडी, ता. संगमनेर येथे आयोजित करण्यात आलेला प.पू. स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह हा भक्ती, सेवा, समाजजागृती आणि अध्यात्माचा अद्वितीय सोहळा ठरणार आहे. हजारो भाविकांच्या उपस्थितीत आणि असंख्य सेवाभावी कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून साकार होणारा हा सप्ताह संगमनेरच्या धार्मिक इतिहासातील आणखी एक सुवर्णपान लिहिणार आहे.

**स्वामी गगनगिरी महाराज : योग, तपश्चर्या आणि मानवसेवेचा अद्भुत संगम**

भारतीय संतपरंपरेमध्ये अनेक संतांनी आपल्या कार्याने समाजाला दिशा दिली. परंतु स्वामी गगनगिरी महाराजांचे स्थान वेगळे आहे. योगसाधना आणि अध्यात्म यांचा विलक्षण संगम त्यांच्या जीवनात पाहायला मिळतो. लहान वयापासूनच त्यांना वैराग्याची ओढ होती. सांसारिक सुखापेक्षा ईश्वरप्राप्ती आणि आत्मसाक्षात्कार यालाच त्यांनी प्राधान्य दिले.

डोंगरदऱ्या, अरण्ये, नद्या आणि निसर्गाच्या कुशीत राहून त्यांनी अनेक वर्षे कठोर तपश्चर्या केली. योगशक्तीच्या माध्यमातून त्यांनी शरीर आणि मन यांवर प्रभुत्व मिळवले. त्यांच्या जीवनातील अनेक घटना आजही भक्तांसाठी प्रेरणादायी आहेत.

महाराज नेहमी सांगत असत-

भक्ती हीच खरी शक्ती आहे. नामस्मरण हेच सर्व दुःखांवरचे औषध आहे. ईश्वरावर श्रद्धा ठेवा आणि सत्कर्म करत राहा. त्यांच्या या संदेशामध्ये जीवनाचे संपूर्ण तत्त्वज्ञान सामावलेले आहे. म्हणूनच आजही हजारो कुटुंबे त्यांना आपल्या जीवनातील मार्गदर्शक मानतात.

**अखंड हरिनाम सप्ताह : भक्तीच्या महासागरातील सात दिवस**

हरिनाम हा शब्द उच्चारला की विठ्ठलनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद, दिंडीचा उत्साह आणि संतवाणीचा गोडवा डोळ्यांसमोर उभा राहतो. अखंड हरिनाम सप्ताह म्हणजे सात दिवस चालणारी अशी एक भक्तीयात्रा आहे, ज्यामध्ये प्रत्येक क्षण ईश्वराच्या स्मरणाने पवित्र होतो.

या सप्ताहामध्ये अखंड हरिनामाचा गजर सुरू असतो. ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, भजन, कीर्तन, हरिपाठ, रामायण कथा आणि महाप्रसाद यांमुळे संपूर्ण परिसर भक्तीरसाने भारलेला असतो.

सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे येणारा प्रत्येक भक्त हा केवळ प्रेक्षक नसतो, तर तो स्वतः या आध्यात्मिक सोहळ्याचा भाग बनतो. कोणीतरी भजन गात असतो, कोणीतरी सेवा करत असतो, कोणीतरी प्रसाद वाटत असतो, तर कोणीतरी हरिनामाच्या गजरात तल्लीन झालेला असतो.




**अधिक मास आणि सप्ताहाची आध्यात्मिक पार्श्वभूमी**

हिंदू धर्मामध्ये अधिक मासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. हा महिना साधना, जप, तप, दान आणि धर्मासाठी विशेष मानला जातो. या काळात केलेले पुण्यकर्म अनेक पटींनी फलदायी मानले जाते.

याच भावनेतून स्वामी गगनगिरी महाराजांनी संगमनेर परिसरातील भक्तांना अधिक मासामध्ये अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्याची प्रेरणा दिली. केवळ नामस्मरणच नव्हे, तर अन्नदान, समाजसेवा आणि आध्यात्मिक जागृती यांनाही या सप्ताहामध्ये समान महत्त्व देण्यात आले.

**संगमनेरची सप्ताह परंपरा : श्रद्धेपासून चळवळीपर्यंतचा प्रवास**

संगमनेर तालुक्यातील अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा ही गेल्या दोन दशकांतील एक मोठी आध्यात्मिक चळवळ आहे. सन २००७ मध्ये समनापूर येथे या सप्ताहाचा प्रारंभ झाला. त्यानंतर २०१० मध्ये पुन्हा समनापूर, २०१२ मध्ये देवगाव, २०१५ मध्ये पिंपरणे, २०१८ मध्ये पिंपळगाव डेपा आणि २०२३ मध्ये जाखुरी येथे सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक सप्ताहासोबत भक्तांची संख्या वाढत गेली. गावोगावच्या दिंड्या सहभागी होऊ लागल्या. समाजातील सर्व स्तरांतील लोक या उपक्रमाशी जोडले गेले. परिणामी आज हा सप्ताह संगमनेरच्या आध्यात्मिक ओळखीचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. कोविड-१९ महामारीमुळे २०२० मध्ये सप्ताहाचे आयोजन करता आले नाही. परंतु भक्तांची श्रद्धा कायम राहिली. आज २०२६ मध्ये गुंजाळवाडी येथे होणारा सप्ताह हीच त्या श्रद्धेची पुढची कडी आहे.

**सप्ताह : केवळ धार्मिक कार्यक्रम नव्हे तर सामाजिक विद्यापीठ**

अखंड हरिनाम सप्ताहाकडे केवळ धार्मिक कार्यक्रम म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. हा सप्ताह म्हणजे समाजजीवनाला दिशा देणारे एक चालते-बोलते विद्यापीठ आहे. आजच्या काळात समाजात तणाव, स्पर्धा, व्यसनाधीनता आणि सामाजिक दुरावा वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत सप्ताहासारखे उपक्रम माणसाला माणसाशी जोडतात.

**गुंजाळवाडी २०२६ : श्रद्धा आणि नियोजनाचा आदर्श संगम**

यंदाचा सप्ताह यशस्वी करण्यासाठी अनेक मान्यवर आणि कार्यकर्ते अहोरात्र परिश्रम घेत आहेत. उद्योजक आबासाहेब थोरात, दिलीपराव शिंदे, देवराज थोरात, पृथ्वीराज थोरात, कपील पवार, गुंजाळवाडीचे सरपंच अमोल गुंजाळ, राजापूर ग्रामस्थ व आजूबाजूच्या गावातील कमिटी सदस्य तसेच सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रातील अनेक मान्यवर या उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली वाहतूक, निवास, पाणीपुरवठा, स्वच्छता, महाप्रसाद, सुरक्षा, आरोग्यसेवा आणि कार्यक्रम व्यवस्थापन यांचे बारकाईने नियोजन करण्यात आले आहे.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात माणूस भौतिकदृष्ट्या प्रगत झाला असला, तरी मानसिक शांततेचा शोध अजूनही सुरू आहे. अशा काळात स्वामी गगनगिरी महाराजांच्या विचारांची आणि अखंड हरिनाम सप्ताहासारख्या उपक्रमांची गरज अधिक अधोरेखित होते.

गुंजाळवाडी येथे आयोजित होत असलेला अखंड हरिनाम सप्ताह २०२६ हा केवळ धार्मिक सोहळा नसून श्रद्धा, संस्कार, सेवा, समाजप्रबोधन आणि अध्यात्म यांचा भव्य महोत्सव आहे. सात दिवस चालणारा हा कार्यक्रम हजारो भक्तांना अंतर्मुख करेल, संतविचारांची प्रेरणा देईल आणि समाजाला एकतेचा संदेश देईल.

प.पू. स्वामी गगनगिरी महाराजांच्या कृपाशीर्वादाने आयोजित हा सप्ताह भविष्यातील पिढ्यांसाठीही प्रेरणेचा दीपस्तंभ ठरेल, यात शंका नाही.

**सोमवार दि. ०८ जून २०२६**

सकाळी ०९.०० ते ११.०० - घटस्थापना व प.पु. स्वामी श्री गगनगिरी महाराजांच्या मूर्तीची स्थापना
सकाळी ११.०० ते १.०० - ज्ञानेश्वरी पारायण प्रारंभ
दुपारी २.३० ते ५.३० - किर्तन ह.भ.प. उमेश महाराज दशरथे (आळंदी)
सायं ६:०० ते ७:०० - हरिपाठ
सायं. ७:०० ते १०:०० - रामायण कथा ह.भ.प. रामराव महाराज ढोक

**मंगळवार, दि. ९ जून २०२६** — सकाळी ९ ते १० - होम हवन व यज्ञ विधी

सकाळी ०८.०० ते ११.०० - ज्ञानेश्वरी पारायण
सकाळी ११.०० ते १.०० - जगदगुरु रामानंदाचार्य श्री. स्वामी नरेंद्र महाराज यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्‌घाटन होईन, व त्यानंतर मार्गदर्शन व दर्शन सोहळा होईल.
दुपारी ३.३० ते ५.३० - किर्तन – विनोदाचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे (नेवासा)
साय. ६:०० ते ७:०० - हरिपाठ
साय. ७:०० ते १०:०० - रामायण कथा – ह.भ.प. रामराव महाराज ढोक

**बुधवार, दि. १० जून २०२६** — सकाळी ९ ते १० - होम हवन व यज्ञ विधी

सकाळी ०८ ते ११ - ज्ञानेश्वरी पारायण
सकाळी ११.०० ते १.०० - व्याख्यान, नंदकुमारजी पोवार साहेब (मा. सरपंच, गगनबावडा)
दुपारी ३.३० ते ५.३० - किर्तन – ह.भ.प. जयवंत महाराज पाटील (राधानगरी)
सायं. ६:०० ते ७:०० - हरिपाठ
साय. ७:०० ते १०:०० - रामायण कथा – ह.भ.प. रामराव महाराज ढोक

**गुरुवार, दि. ११ जून २०२६ (एकादशी)** — सकाळी ९ ते १० - होम हवन व यज्ञ विधी

सकाळी ९:०० ते १०:०० - ज्ञानेश्वरी पारायण
सकाळी ११.०० ते १.०० - व्याख्यान, श्री. इंद्रजित देशमुख मातृ पितृ पुजन सोहळा
दुपारी ३.३० ते ५.३० - किर्तन – ह.भ.प. विशाल महाराज खोले
साय. ६:०० ते ७:०० - हरिपाठ
साय. ७:०० ते १०:०० - रामायण कथा – ह.भ.प. रामराव महाराज ढोक

**शुक्रवार, दि. १२ जून २०२६** — सकाळी ९ ते १० - होम हवन व यज्ञ विधी

सकाळी ०८.०० ते ११.०० - ज्ञानेश्वरी पारायण
सकाळी ११.०० ते १.०० - व्याख्यान, डॉ. श्री. संजयजी मालपाणी
दुपारी ३.३० ते ५.३० - किर्तन – ह.भ.प. सोपान महाराज (शास्त्री) सानप
सायं. ६:०० ते ७:०० - हरिपाठ
साय. ७:०० ते १०:०० - रामायण कथा – ह.भ.प. रामराव महाराज ढोक

**शनिवार, दि. १३ जून २०२६** — सकाळी ९ ते १० - होम हवन व यज्ञ विधी

सकाळी ०८.०० ते ११.०० - ज्ञानेश्वरी पारायण
सकाळी ११.०० ते १.०० - व्याख्यान, श्री. भास्करराव पेरे पाटिल (मा. सरपंच, पाटोदा)
दुपारी३.३० ते ५.३० - किर्तन – ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक
सायं. ६:०० ते ७:०० - हरिपाठ
साय. ७:०० ते १०:०० - रामायण कथा – ह.भ.प. रामराव महाराज ढोक

**रविवार, दि. १४ जून २०२६** — सकाळी ९ ते १० - होम हवन व यज्ञ विधी

सकाळी ०८.०० ते ११.०० - ज्ञानेश्वरी पारायण सांगता
सकाळी ११.०० ते १.०० - व्याख्यान, ह.भ.प. सौ. शालिनीताई देशमुख इंदोरीकर
दुपारी ३.३० ते ५.३० - किर्तन/जागर – ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर
सायं. ६:०० ते ७:०० - हरिपाठ
साय. ७:०० ते १०:०० - रामायण कथा- ह.भ.प. रामराव महाराज ढोक

**सोमवार, दि. १५ जून २०२६**

सकाळी १०.०० ते ०१.०० - ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांचे काल्याचे किर्तन
दुपारी ०१.०० नंतर - महाप्रसाद

## प. पू. गगनगिरी...

पान १ वरून - महिला भगिनींनी डोक्यावर मंगलमय कलश धारण करत भक्तिभावाने सहभाग नोंदविला. हजारो वारकरी, भाविक आणि ग्रामस्थांनी टाळ-मृदंगाच्या गजरात हरिनामाचा जयघोष करत मिरवणुकीला अलौकिक स्वरूप प्राप्त करून दिले.

फुलांनी आणि आकर्षक सजावटीने नटलेल्या रथामध्ये विराजमान असलेल्या परमपूज्य श्री स्वामी गगनगिरी महाराजांच्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी एकच गर्दी केली होती. जवळपास दोन तास चाललेल्या या भव्य मिरवणुकीचा समारोप सप्ताहस्थळी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झाला. मिरवणुकीनंतर परमपूज्य श्री स्वामी गगनगिरी महाराजांच्या मूर्तीची वैदिक मंत्रोच्चारात विधिवत स्थापना व घटस्थापना करण्यात आली. त्यानंतर ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ झाला. ह.भ.प. उमेश महाराज दशरथे यांच्या प्रभावी कीर्तनातून भक्तांना अध्यात्म, सदाचार आणि नामस्मरणाचा अमूल्य संदेश मिळाला. तसेच हरिपाठाच्या माध्यमातून भक्तांनी विठ्ठलनामाचा अखंड जप केला. सायंकाळी सात वाजता ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्या रसाळ आणि ओघवत्या रामायण कथेचा प्रारंभ झाला. प्रभू श्रीरामांच्या चरित्राचे श्रवण करताना हजारो भाविक भावविभोर झाले. रामकथेतील आदर्श, भक्ती आणि संस्कारांचे दर्शन घडवत या कार्यक्रमाने उपस्थितांना आध्यात्मिक आनंदाची अनुभूती दिली. सप्ताहाच्या या मंगलमय प्रारंभामुळे गुंजाळवाडी परिसरात भक्ती, श्रद्धा, नामस्मरण आणि अध्यात्माचा दिव्य संगम अनुभवास येत असून पुढील सात दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांमधून भाविकांना आध्यात्मिक पर्वणी लाभणार आहे. स्वामी गगनगिरी महाराजांच्या कृपाशीर्वादाने आणि विठ्ठलनामाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला आहे.

## राज्यात जोरदार पावसाची शक्यता
### हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांचा मोठा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - शेतकऱ्यांचे डोळे मान्सूनकडे लागले होते. अखेर प्रतिक्षा संपली आहे. महाराष्ट्रात मान्सूनचं आगमन झालं आहे. मान्सून तळकोकणात दाखल झाला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून तब्बल २५ जिल्हांना जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुढील चार ते पाच दिवस पुणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा या जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचं अवाहन करण्यात आलं आहे. दरम्यान हवामान विभागाच्या अंदाजानंतर आता हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी देखील राज्यात मान्सूनची पुढील वाटचाल कशी असेल याबाबत आपला अंदाज व्यक्त केला आहे.



'मान्सून तळकोकणातून सक्रिय झाला आहे. तो आता हळहुळ पुढे सरकत आहे. सात तारखेचा पाऊस हा सर्वदूर होणार नाही. ८ जून, ९ जून असा थोडा-थोडा करत मान्सून राज्यात पुढे सरकणार आहे. १४ जूनपर्यंत मान्सून महाराष्ट्राचा बरासचा भाग कव्हर करेल असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवलेला आहे. सात जूनच्या रात्रीपर्यंत बऱ्याच भागांमध्ये सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, पुणे, बीड जिल्हा, लातूर, जिल्हा धाराशिव जिल्हा मराठवाड्यापर्यंत मान्सून मजल मारेल. उत्तर महाराष्ट्रातही काही जिल्ह्यांपर्यंत मान्सून पोहोचेल अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली आहे.

दरम्यान यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना देखील सल्ला दिला आहे. शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, जर शेतात एक इतिपेक्षा जास्त ओल असेल तरच पेरणी करावी, एक किंवा दोन बोट ओल असेल तर पेरणी करू नये, असंही यावेळी डख यांनी म्हटलं आहे. दरम्यान भारतीय हवामान विभागाकडून देखील मान्सूनचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मान्सून तळकोकणात दाखल झाला आहे, परंतु तो अद्याप महाराष्ट्राच्या अनेक भागांपर्यंत पोहोचायचा आहे. येत्या १५ जून पर्यंत मान्सून राज्यातील बहुतांश भाग व्यापून टाकेल असा अंदाज भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

## प्रवरा कालव्यातून आवर्तन सोडण्याचे पालकमंत्र्यांचे निर्देश

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - उन्हाळ्यातील पिण्याच्या पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन प्रवरा डाव्या व उजव्या कालव्यातून सिंचन तसेच बिगर सिंचनाचे दुसरे एकत्रित आवर्तन तातडीने सोडण्यात येणार आहे. नदीकाठच्या गावांना मोठा दिलासा देणारे हे आवर्तन सोडण्याचे निर्देश जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत.

सध्या उन्हाची तीव्रता वाढल्याने बहुतांश गावांतील पाण्याचे स्त्रोत आटले आहेत. शेतीसह पाणीपुरवठा योजनांना पाणी उपलब्ध होत नसल्याने नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासह जनावरांसाठी पाणी मिळावे, अशी शेतकरी व नदीकाठच्या गावांकडून मोठ्या प्रमाणात मागणी होत होती.

लोणी येथे आयोजित जनता दरबाराच्या माध्यमातून आमदार अमोल खताळ यांच्यासह शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने या प्रश्नावर तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली होती. या विनंतीची दखल घेत धरणातील पाण्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला व त्यानंतर हे एकत्रित आवर्तन सोडण्याचा निर्णय झाला. सुरू होणाऱ्या या आवर्तनातून पाण्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे
मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे
मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग,
सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी,
प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड,
संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# निळवंडेचे हक्काचे पाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेच पाहिजे : माजी मंत्री थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - चिंचोली गुरव येथे पाणी परिषद झाली आणि त्यातून निळवंडे सुरू झाले. धरण व कालव्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करून ते पूर्ण केले. आता पाणी आले आहे. कालव्यांना कॉंक्रिटीकरण केल्याने पाणी पुढे वाहून चालले आहे निळवंडे चे हक्काचे पाणी शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. सत्तेत असेल त्याने आपल्या तालुक्याचे पाणी जपणे आणि पाणी वाढवणे ही जबाबदारी आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन पाण्याची काळजी घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन निळवंडे धरण व कालव्यांचे निर्माते माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.



चिंचोली गुरव येथे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून पाईप टाकून भरवण्यात आलेल्या बंधाऱ्याचे जलपूजन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग पा. घुले, ज्येष्ठ संचालक संपतराव गोडगे, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, माजी जिल्हा परिषद सदस्य महेंद्र गोडगे, रामहरी कातोरे, गुलाबराव देशमुख, रावसाहेब दुबे, माजी सभापती अविनाश सोनवणे, राजहंस ट्रान्सपोर्टचे अध्यक्ष हौशीराम सोनवणे, शेतकी संघाचे संचालक सचिन दिघे ,सरपंच विलास सोनवणे, वाल्मीक गोडगे, विनोद गोडगे, विजय गोडगे,विलास मास्तर सोनवणे, संदेश गोडगे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, निळवंडे चे पाणी दुष्काळी भागात शेतकऱ्याला देणे हे आपले स्वप्न होते. या पाण्यापासून कुणीही वंचित राहणार नाही. असा विचार करून आपण मध्य प्रदेश येथील मोहनपुराच्या धर्तीवर योजना तयार केली होती. कालव्याच्या वरच्या बाजूलाही पाणी जाईल यासाठी नियोजन केले. पण सध्या निळवंडे कालव्याला कॉंक्रिटीकरण केल्याने पाणी कुठे चालले आहे? सत्तेत येईल त्याने आपल्या तालुक्याच्या हक्काचे पाणी जपणे आणि वाढवणे गरजेचे असते. लढाई पाण्याची असेल तर राजकारणा पलीकडे जाऊन काळजी घेतली पाहिजे. पाणी जपणे आणि वाढवणे ही आपली जबाबदारी आहे.

पाण्यासाठी आपण मोठा संघर्ष केला आहे. पाणी हा जीवनाचा विषय आहे. पाणी आणि वीज या विषयावर बोलले पाहिजे .त्यासाठी भांडले पाहिजे .आपल्या सत्तेच्या काळा तालुक्यात सर्वाधिक वीज उपकेंद्र झाली. शेतकऱ्यांना पिक विमा मिळवण्यासाठी काळजी घ्यावी लागते. मात्र पाणी वीज आणि पीक विमा या विषयावर सध्याचे लोकप्रतिनिधी बोलत नाही हे दुर्दैव असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. निळवंडे धरणाच्या पाण्याने जितका भाग जास्तीत जास्त ओलिताखाली आणता येईल तो आपला प्रयत्न आहे. नान्नज, निमोण, पारेगाव या भागांसाठी उपसा जलसिंचन योजना आपण मंजूर केल्या होत्या. मात्र त्याला स्थगिती देण्यात आली आहे.

सत्ता मिळवण्यासाठी काहीही करणारा भाजप हा पक्ष असून धर्म केवळ सांगण्यासाठी असतो. मात्र ते धर्माचे राजकारण करत आहे. भावी पिढीला लोकशाही पाहायला मिळेल की नाही याबाबतची चिंता ही त्यांनी व्यक्त करून सध्याचे राजकारण चुकीचे सुरू आहे. ते दुरुस्त करण्याची जबाबदारी जनतेची असल्याचे ते म्हणाले.

तर संपतराव गोडगे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने विविध गावांसाठी पाईप दिले आहेत पाईप टाकल्याने गावांमध्ये पाणी आले आहे. तळेगाव गटातील देवकवठे, करुले लोहारे वडझडी यांस विविध गावांमध्ये कारखान्याने पाईप दिल्याने पाणी आले आहे यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण झाला आहे.

# जमिनीच्या वादातून शेतात बेकायदेशीरीत्या मुरूम टाकला

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - संगमनेर तालुक्यातील शेडगाव येथे जमिनीच्या वादातून शेतात बेकायदेशीरपणे मुरूम टाकून नुकसान केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकाराला विरोध केल्यानंतर संबंधित शेतकरी कुटुंबातील महिला व पुरुषांना शिवीगाळ, मारहाण तसेच जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.




याप्रकरणी तहसीलदार कार्यालयात निवेदन देण्यात आले असून आश्वी पोलीस ठाण्यात एनसीआर नोंदविण्यात आला आहे. शेडगाव येथील रहिवासी रामराव भिकाजी सांगळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मौजे शेडगाव येथील गट क्रमांक ६११ मधील त्यांच्या मालकीच्या शेतात ४ जून २०२६ रोजी रात्रीच्या वेळी डंपरद्वारे मोठ्या प्रमाणात मुरूम टाकण्यात आला.

या घटनेमुळे शेतजमीन व पिकांचे नुकसान झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. याबाबत जाब विचारण्यासाठी कुटुंबीय गेले असता वाद निर्माण झाला. यामध्ये शिवीगाळ, धक्काबुक्की आणि काठीने मारहाण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच महिलांना व कुटुंबियांना जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचेही तक्रारीत नमूदं करण्यात आले आहे.' याप्रकरणी एका महिलेने आश्वी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता अंतर्गत संबंधित कलमांनुसार एनसीआर क्रमांक ०२५२/२०२६ नोंदविला आहे. पोलिसांनी दोन्ही बाजूंची माहिती घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. दरम्यान, रामराव सांगळे यांनी संगमनेर तहसीलदारांकडे लेखी अर्ज सादर करून गट क्रमांक ६११ मधीलं बेकायदेशीररीत्या टाकण्यात आलेल्या मुरुमाचा पंचनामा करण्याची मागणी केली आहे. तसेच संबंधित मुरूम तातडीने हटवून दोषींवर महसूल व कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी अर्जाद्वारे करण्यात आली आहे. या घटनेमुळे शेडगाव परिसरात खळेबळ उडाली असून शेतकरी वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे. पीडित कुटुंबाने प्रशासनाकडे संरक्षण देण्याबरोबरच दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याप्रकरणी पुढील तपास' आश्वी पोलीस व महसूल विभागाकडून सुरू आहे.

# पर्यावरण रक्षणासाठी विजया ॲग्रो इंडस्ट्रीजचा पुढाकार





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विजया ॲग्रो इंडस्ट्रीज यांच्या वतीने ५० गावांमध्ये शेतकरी बैठकींचे आयोजन करून पर्यावरण संवर्धन, शाश्वत शेती आणि नैसर्गिक संसाधनांच्या जतनाबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली. ही मोहीम सोलापूर, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, नाशिक, सातारा, संभाजीनगर, जालना आणि जळगाव या जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आली.

या बैठकींमध्ये मातीचे आरोग्य जपणे, पाणी बचत, रासायनिक अवशेष कमी करणे, जैविक व पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा अवलंब तसेच नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पर्यावरणाचे संरक्षण आणि भावी पिढ्यांसाठी निरोगी निसर्ग राखणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.विजया ॲग्रो इंडस्ट्रीज ही जैविक व सेंद्रिय कृषी निविष्ठांच्या माध्यमातून शाश्वत आणि अवशेषमुक्त शेतीला प्रोत्साहन देत आहे. कंपनीची जैविक खते, सूक्ष्मजीव आधारित उत्पादने, जैविक कीड व रोग व्यवस्थापन उपाय यांमुळे जमिनीचे आरोग्य सुधारण्यास, रासायनिक खत व कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी करण्यास तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होत आहे. कंपनीच्या प्रतिनिधींनी यावेळी सांगितले की, पर्यावरण संवर्धन ही केवळ एका दिवसाची जबाबदारी नसून ती शेतीच्या प्रत्येक टप्प्यात कृतीतून जपली गेली पाहिजे. जैविक आणि सेंद्रिय शेती पद्धतींचा अधिकाधिक अवलंब केल्यास माती, पाणी, पर्यावरण आणि मानवी आरोग्य यांचे संरक्षण होण्यास मोठी मदत होईल.

या उपक्रमाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. निरोगी माती, निरोगी पर्यावरण आणि समृद्ध शेतकरी हा संदेश देत विजया ॲग्रो इंडस्ट्रीजने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून व्यापक जनजागृती मोहीम यशस्वीपणे राबविली.

# शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप सुरु

## आ. अमोल खताळ यांचा पुढाकार; पशुपालक व शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांना वर्षभर दर्जेदार हिरवा चारा उपलब्ध व्हावा तसेच जनावरांच्या वैरणीचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागावा, या उद्देशाने आमदार अमोल खताळ यांच्या पुढाकारातून प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप योजना सुरू करण्यात आली आहे. पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागामार्फत ही योजना राबविण्यात येत असून तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना याचा लाभ दिला जाणार आहे.



सध्या बदलत्या हवामानाचा शेती आणि पशुपालन व्यवसायावर मोठा परिणाम होत आहे. अनियमित पाऊस, वाढते तापमान आणि चाऱ्याची कमतरता यामुळे पशुपालकांसमोर अनेक अडचणी निर्माण होत आहेत. विशेषतः उन्हाळ्याच्या काळात हिरव्या चाऱ्याची टंचाई भासत असल्याने जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी पौष्टिक, मुबलक आणि वर्षभर उपलब्ध राहील असा हिरवा चारा उत्पादनाला चालना मिळावी, या हेतूने ही योजना सुरू करण्यात आली आहे. योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना वैरण पिकांच्या बियाण्यांचे वितरण करण्यात येणार आहे. या बियाण्यांच्या माध्यमातून शेतकरी स्वतःच्या शेतात चारा पिकांचे उत्पादन वाढवू शकतील.

> अनेक भागांमध्ये हिरव्या चाऱ्याची टंचाई जाणवत आहे. काही शेतकऱ्यांकडे जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध असला तरी अनेक पशुपालकांना चाऱ्याअभावी अडचणींचा सामना करावा लागत आहे. पशुपालकांच्या या समस्येची दखल घेत पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागामार्फत प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतात दर्जेदार वैरण पिकविण्याची संधी मिळणार असून वर्षभर जनावरांसाठी पौष्टिक हिरवा चारा उपलब्ध राहण्यास मदत होईल. पशुधनाचे आरोग्य चांगले राहून दूध उत्पादन वाढण्यासही हातभार लागेल. तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी आणि पशुपालकांनी या योजनेचा लाभ घेऊन आपला पशुपालन व्यवसाय अधिक सक्षम करावा.
>
> – अमोल खताळ, आमदार

त्यामुळे जनावरांसाठी वर्षभर हिरवा चारा उपलब्ध होण्यास मदत होणार असून पशुधनाचे संगोपन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. तसेच पशुपालकांच्या आर्थिक खर्चातही बचत होण्यास मदत होईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संगमनेर पंचायत समितीच्या पशुसंवर्धन कार्यालयाशी अथवा तालुक्यातील २४ पशुसंवर्धन दवाखान्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी पुंडलिक येवले यांनी केले आहे.

# वादळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी - शेख



युवावार्ता (प्रतिनिधी)

साकूर - संगमनेर तालुक्यात शुक्रवारी (दि. ५ जून) दुपारच्या सुमारास झालेल्या वादळी पाऊस व गारपिटीमुळे साकूर पठार भागातील जांबुत व मांडवे परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या घरांचे तसेच पिकांचे मोठे नुकसान झाले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने शासकीय मदत मिळावी, अशी मागणी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रऊफ शेख यांनी केली आहे.

वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांचे पत्रे उडून गेल्याने कुटुंबांचा संसार उघड्यावर पडला आहे. तसेच गारपिटीमुळे शेतातील उभ्या पिकांनाही फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार अमोल खताळ यांनी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून अहवाल शासनाकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार महसूल प्रशासनाने आज नुकसानग्रस्त भागात पाहणी करून पंचनामे सुरू केले. रऊफ शेख यांनी जांबुत व मांडवे परिसरातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी भेट देऊन त्यांच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना धीर देत आमदार अमोल खताळ व पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील हे त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले.

जांबुत येथील वसंत भिवा झिटे यांच्या घराचे मोठे नुकसान होऊन त्यांचा संसार उघड्यावर आला आहे. तसेच चौदबी फारुक सय्यद यांच्या घरावरील पत्रे उडून शेजारच्या शेतात जाऊन पडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. जांबुत खुर्द येथील दस्तगीर पठाण तसेच साकूर-मांडवे शिवारातील अश्पाक युनूस पठाण यांच्या घरांचेही मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्तांची भेट घेतल्यानंतर रऊफ शेख यांनी आमदार अमोल खताळ यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून परिस्थितीची सविस्तर माहिती दिली. तसेच सर्व बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.यावेळी संतोष शेटे, अशोक झिटे, दत्ता देवकाते, पोपट गाढवे, सुरेश भागवत आदी महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# रायगडावर शिवभक्तांसाठी अश्विन आयुर्वेद महाविद्यालयाची आरोग्यसेवा

## सामाजिक बांधिलकीतून दिले योगदान

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी- स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त रायगडावर लाखो शिवभक्तांनी उपस्थिती लावली. यावेळी संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथील अश्विन रुरल आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, मांचीहिल यांनी सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेत मोलाचे योगदान दिले.

शिवराज्याभिषेक सोहळा आयोजन समितीच्या आरोग्य विभागामार्फत आयोजित विशेष आरोग्य शिबिरात महाविद्यालयाच्या डॉक्टरांच्या पथकाने सक्रिय सहभाग नोंदवला. रायगडावर आलेल्या शिवभक्तांना उन्हामुळे होणारा थकवा, चक्कर येणे, उष्माघात तसेच इतर किरकोळ आरोग्य समस्यांवर तातडीने उपचार करून दिले. दि. ५ व दि. ६ जून रोजी आयोजित या आरोग्य शिबिराचा तब्बल २ ते ३ हजार शिवभक्तांनी लाभ घेतला. डॉ. ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वैद्य विवेक देशमुख, वैद्य क्षितीज देशमुख आणि वैद्य कुणाल पाटील यांनी रुग्णसेवेत विशेष योगदान दिले.

इतिहास, संस्कृती आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम साधत अश्विन आयुर्वेद महाविद्यालयाने शिवभक्तांच्या आरोग्यसेवेसाठी केलेले कार्य कौतुकास्पद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. वेळेवर उपचार आणि आवश्यक मार्गदर्शन मिळाल्याने अनेक शिवभक्तांनी समाधान व्यक्त केले. भविष्यातही अशा मोठ्या प्रमाणातील आरोग्य शिबिरे राबविण्याचा मानस डॉ. ज्ञानेश्वर शिंदे यांनी व्यक्त केला.

## संपादकीय...

# स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा

९ जून, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# शिर्डीत राज्यस्तरीय भाजीपाला मूल्यसाखळी परिषद उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - महाराष्ट्रातील भाजीपाला क्षेत्र अधिक शाश्वत, स्पर्धात्मक आणि बाजाराभिमुख करण्याच्या उद्देशाने इंडो व्हेजिटेबल्स डेव्हलपमेंट असोसिएशनतर्फे राज्यस्तरीय भाजीपाला मूल्यसाखळी परिषदेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासन व जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या कमोडिटी स्टुअर्डशिप कौन्सिल उपक्रमाच्या माध्यमातून ही परिषद पार पडली. भाजीपाला मूल्यसाखळी अधिक सक्षम करण्यासाठी शाश्वत शेती, गुणवत्ता मानकीकरण आणि बाजारपेठीय दृष्टिकोन यावर परिषदेत सखोल चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. संतोष सहाणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर अध्यक्ष सारंगधर निर्मळ यांनी परिषदेची रूपरेषा स्पष्ट केली. डॉ. के. ई. लवांडे, डॉ. उमाकांत दांगट, महानंदचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर, डॉ. भाग्यश्री टिळेकर तसेच प्रियांका भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

परिषदेत आयोजित पहिल्या तांत्रिक सत्रात मृदा आरोग्य संवर्धन, खर्च कमी करणाऱ्या जैव-निविष्ठा, शाश्वत शेती पद्धती तसेच सेंद्रिय आणि अवशेषमुक्त उत्पादनांच्या माध्यमातून भाजीपाला क्षेत्राची स्पर्धात्मकता वाढविण्यावर चर्चा झाली. तज्ज्ञांनी अवशेषमुक्त व विषमुक्त शेती उत्पादनांना देशांतर्गत आणि जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी असल्याचे नमूद केले. निर्यातक्षम उत्पादनांसाठी सक्षम प्रमाणन व्यवस्था आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले. शेतकऱ्यांनी मृदा परीक्षणाचा अधिक वापर करून जमिनीच्या गरजेनुसार निविष्ठांचा वापर केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादकता वाढू शकते, असे मत व्यक्त करण्यात आले.

दुसऱ्या तांत्रिक सत्रात कांदा मूल्यसाखळीवर सविस्तर चर्चा झाली. कांदा बियाणे प्रमाणीकरण व्यवस्था अधिक मजबूत करणे, गुणवत्तापूर्ण बियाण्यांची उपलब्धता वाढविणे आणि उत्पादन व उत्पादकतेसंदर्भातील एकसंध व प्रमाणित माहिती संच विकसित करण्याची गरज तज्ज्ञांनी अधोरेखित केली. कांदा पुरवठा साखळीत पारदर्शकता आणि मागोवा प्रणाली विकसित केल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला अधिक योग्य दर मिळण्यास मदत होईल, असेही मत व्यक्त करण्यात आले. तसेच जैवखते आणि जैव-निविष्ठांचा वापर वाढवून उत्पादन खर्च कमी करणे व मृदा आरोग्य सुधारणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

यानंतर कृषी क्षेत्रातील नवकल्पना, आधुनिक तंत्रज्ञान आणि उद्योजकता यावरील विशेष संवाद सत्र आयोजित करण्यात आले. यामध्ये कृषी क्षेत्रातील नव्या संधी, तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकरी सक्षमीकरणावर मार्गदर्शन करण्यात आले.

समारोपप्रसंगी प्रियांका शेळके यांनी उपस्थित मान्यवर, तज्ज्ञ, शेतकरी, उत्पादक कंपनी प्रतिनिधी, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि सहभागींचे आभार मानले. भाजीपाला क्षेत्रात शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार, गुणवत्ता मानकीकरण, मूल्यवर्धन आणि बाजारपेठीय संधींचा विस्तार करण्यासाठी संघटना कटिबद्ध असून, परिषदेतून पुढे आलेल्या शिफारशींच्या आधारे भविष्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# 'हेरिटेज वॉक'मधून पेमगिरीच्या ऐतिहासिक वैभवाचा अभ्यास प्रेरणादायी - प्रकाश आरोटे

संगमनेर (प्रतिनिधी)

अकोले - संगमनेर परिसरातील ऐतिहासिक वारसा जतन करून तो नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या 'हेरिटेज वॉक' उपक्रमांतर्गत रविवारी पेमगिरी येथील ऐतिहासिक शहागड (प्रेमगड) आणि महाकाय वटवृक्ष तिसऱ्या अभ्यास सहलीचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले होते. सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयाचा इतिहास विभाग व जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला.

सकाळी संगमनेर बसस्थानकातून सहलीला प्रारंभ झाला. पेमगिरी येथे पोहोचल्यानंतर सहभागी सदस्यांनी शहागडाचा इतिहास, तेथील सातवाहन टाके स्थापत्यवैशिष्ट्ये आणि ऐतिहासिक महत्त्व समजून घेतले. यावेळी इंजिनिअर नानासाहेब खर्डे यांनी प्राचीन ते मध्ययुगीन इतिहासाचा आढावा घेत सातवाहनकालीन पाण्याच्या टाके याबाबत सविस्तर माहिती दिली.संयोजक प्रा.विठ्ठलराव शेवाळे यांनी शहाजी महाराजांच्या कार्याचा विशेष उल्लेख करताना सांगितले की, निजामशाहीचा वारसदार मुर्तजा याला जीवधन किल्ल्यावरील नजरकैदेतून मुक्त करून शहाजी महाराजांनी पेमगडावर आणले आणि त्याला गादीवर बसवून स्वतः सन १६३३ ते १६३६ या काळात कारभार सांभाळला. स्वराज्याच्या संकल्पनेची बीजे याच भूमीत रुजली आणि शहाजीराजांच्या पावलांनी हा गड पावन झाला.छत्रपती शिवरायांमध्ये स्वराज्याची बीज रोपन केले आणि जिजाबाईंनी खतपाणी घातले असे नमूद केले.

यानंतर सहभागी सदस्यांनी पेमगिरी येथील महाकाय वटवृक्षाला भेट दिली. वाल्मीक कोल्हे आणि डॉ.भुतांबरे यांच्या मालकीच्या शेतातील या वटवृक्षाचा इतिहास, त्याचा अडीच ते पावणेतीन एकरांपर्यंत विस्तार आणि 'जाखमत बाबा'शी संबंधित लोककथा यांची प्रा. शेवाळे यांनी रंजक माहिती दिली.त्यानंतर सर्वांनी गावातील प्राचीन मारुती मंदिरात दर्शन घेतले.



सहली दरम्यान वाल्मीक कोल्हे परिवारातर्फे अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. दुपारनंतर सर्व सदस्य सुखरूप संगमनेर येथे परतले.प्रकल्प प्रमुख रमेश थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. प्रा. विठ्ठल शेवाळे यांनी सहलीचे नियोजन केले तर डॉ.माणिकराव शेवाळे यांनी स्कूलबसची सुविधा उपलब्ध करून दिली. या उपक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आरोटे, डॉ.उमा कुलकर्णी, सतीश मालवणकर, ॲड. ज्ञानदेव सहाणे यांच्यासह इतिहास विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'हेरिटेज वॉक' उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक ऐतिहासिक स्थळाचा इतिहास, वास्तुशैली आणि त्यामागील संदर्भ तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून अत्यंत रंजक आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने उलगडला जातो. त्यामुळे या उपक्रमात युवकांसह ज्येष्ठ नागरिकांचाही उत्स्फूर्त सहभाग वाढत असून, हा अनुभव माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि आनंददायी ठरत असल्याची भावना सहभागी सदस्यांनी व्यक्त केली.

# शेतकरी कर्जमाफी...

पान १ वरून -

नाशिक, जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यांमुळे केळीच्या बागा कोसळल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. अनेक ठिकाणी काढणीस आलेले पीक जमीनदोस्त झाले असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत आणि पंचनामे करण्याची मागणी सातत्याने होत आहे.

राज्यात शेतकरी प्रश्न, कर्जमाफी आणि विरोधी पक्षांच्या एकजुटीबाबत चर्चा सुरू असताना शरद पवार यांच्या या भूमिकेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. विशेषतः कर्जमाफीच्या निकषांवरून सुरू असलेल्या वादात त्यांनी घेतलेली 'दुरुस्ती करा, पण योजना रद्द करू नका' ही भूमिका आगामी काळात महत्त्वाची ठरू शकते.

# लिंगदेव येथे मंगळवारपासून अखंड हरिनाम सप्ताह

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले -तालुक्यातील लिंगदेव येथील मोबाईल श्री क्षेत्र लिंगेश्वर देवस्थान येथे अधिक मासानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज शिवलीलामृत पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार (दि.९) ते शुक्रवार (दि.१२) या कालावधीत होणाऱ्या या धार्मिक सोहळ्यामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



सप्ताह काळात पहाटे ५ ते ६ यावेळेत श्री लिंगेश्वरांचा रुद्राभिषेक, सकाळी ७.३० ते ११ यावेळेत ग्रंथराज शिवलीलामृत पारायण व विष्णूसहस्त्रनाम स्तोत्र पठण, दुपारी भजन सेवा, गाथा भजन, सायंकाळी प्रवचन व हरिपाठ तसेच रात्री कीर्तन आणि जागर सेवा असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

सप्ताहाच्या पहिल्या दिवशी विवेक महाराज केदार, दुसऱ्या दिवशी शिवानंद महाराज पाटील, तिसऱ्या दिवशी एकनाथ महाराज चत्तर यांचे कीर्तन होणार आहे. सप्ताहाच्या समारोपप्रसंगी अनंत महाराज काळे यांचे काल्याचे कीर्तन होणार असून सप्ताहाची भक्तिमय सांगता होणार आहे. या सप्ताहात तालुक्यातील दिग्गज मृदुंगाचार्य व गायनाचार्य यांची सेवा लाभणार आहे.

तरी अधिक मासातील या पवित्र पर्वात अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज शिवलीलामृत पारायण, प्रवचन, कीर्तन, पालखी सोहळा आणि महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी तालुक्यासह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.


**पाहिजेत**

सार्थक अॅग्रोव्हेट या नामांकित कंपनी करिता

टेलीकॉलर महिला - २
ड्रायव्हर - २

नाशिक पुणे हायवे, छत्रपती चौक, घुलेवाडी, संगमनेर

९५५२५०६३६३

**पाहिजेत**

संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत.

टू व्हिलर आवश्यक

9860049439

**भाड्याने देणे आहे**

संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी

२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे

- पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन
- वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
- थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध
- व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा

पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर

- संपर्क - 9822258458

**पाहिजेत**

मे. संदीप महाले ज्वेलर्ससाठी दागिन्यांच्या बिलिंगसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत

- संपर्क-
मे. संदीप बबन महाले ज्वेलर्स बाजारपेठ, संगमनेर, जि. अ.नगर

8698305864

**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846

**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर श्री गणेश टायर्स या फॉर्मसाठी

सेल्समन -3
सुपर कॅरी ड्रायव्हर - 1

कामाचा अनुभव आवश्यक

9423793758

**कामगार भरती**

अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक

सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक

वॉचमन- ०१

ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर

9028342110
9262625962

**जागा भाड्याने देणे**

३ मजली
८०० स्क्वेफूट

ठिकाण - मोमीनपुरा चौक,फेमस शुज समोर, संगमनेर

9028342110

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)

पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष) ट्रेनिंग दिले जाईल

रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक

ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)

माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६






# लिंगनिदान रॅकेटचा पर्दाफाश

## आणखी एका मेडिकल चालकासह १९ आरोपी जेरबंद

## पाच सोनोग्राफी मशिन जप्त





युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -जिल्ह्यात उघडकीस आलेल्या राज्यव्यापी लिंगनिदान चाचणी व अवैध गर्भपात रॅकेटच्या तपासात पोलिसांना आणखी एक मोठे यश मिळाले असून, श्रीगोंदा तालुक्यातील मेडिकल चालक जालिंदर रामदास बोरुडे याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून बेकायदेशीर गर्भलिंग निदानासाठी वापरण्यात येणारे सोनोग्राफी मशीन आणि क्रेटा ही चारचाकी गाडी जप्त करण्यात आली आहे. या कारवाईमुळे या बहुचर्चित प्रकरणातील अटक आरोपींची संख्या आता १९ वर पोहोचली आहे.

लोणी पोलीस ठाण्यात सुरुवातीला लिंगनिदान चाचणी आणि अवैध गर्भपात प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात नेवासा येथील डॉ. भणगे, दोन एजंट आणि सहा कुटुंबीय अशा एकूण नऊ जणांना अटक करण्यात आली होती. त्यावेळी पोलिसांनी एक पोर्टेबल सोनोग्राफी मशीन आणि तीन चारचाकी वाहने जप्त केली होती.

त्यानंतर तपासाची व्याप्ती वाढवत पोलिसांनी ढगे नावाच्या आरोपीकडून आणखी एक पोर्टेबल सोनोग्राफी मशीन जप्त केले. याच तपासादरम्यान अनेक एजंटांना अटक करण्यात आली. पुढे श्रीरामपूर येथील डॉ. कुटे आणि डॉ. शेख यांनाही अवैध लिंगनिदान चाचण्या व बेकायदेशीर गर्भपात प्रकरणात अटक करण्यात आली. तपास अधिक खोलवर नेत पोलिसांनी पुणे येथील दोन डॉक्टर आणि वैद्यकीय साहित्य विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला अटक केली. या आरोपींकडून मिळालेल्या माहितीनुसार वडगाव मावळ येथील मारुती ढोरे याला अटक करून त्याच्याकडील अवैध लिंगनिदानासाठी वापरण्यात येणारे मशीन जप्त करण्यात आले.

पुण्यातील आरोपींची चौकशी सुरू असताना नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील डॉ. कुणाल वलटे यांनीही बेकायदेशीररीत्या सोनोग्राफी मशीन खरेदी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने डॉ. वलटे यांच्यासह मेडिकल चालक सागर उन्हाळ याला ताब्यात घेऊन अटक केली.

पुणे येथील मेडिकल साहित्याचा घाऊक विक्रेता नरेंद्र ठाकरे याची चौकशी करताना आणखी एका मेडिकल चालकाचे नाव समोर आले होते. त्यानंतर गेल्या दहा-बारा दिवसांपासून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू होता. अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, आरोपी श्रीगोंदा तालुक्यातील आरडगाव परिसरात शेतातील झोपडीत लपून बसल्याचे समोर आले. त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमणे, श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे आणि श्रीरामपूर अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पथकाने संयुक्त कारवाई करून आरोपी जालिंदर रामदास बोरुडे (वय ४०, रा. घोगरगाव, ता. श्रीगोंदा) याला ताब्यात घेतले. पोलिसांना अटकेची चाहूल लागल्याने बोरुडे हा नगर तालुक्यातील हातवळण शिवारातील स्वत:च्या शेतातील झोपडीमध्ये लपून राहत होता. त्याच्याकडून अवैध गर्भलिंग निदानासाठी वापरण्यात येणारे सोनोग्राफी मशीन आणि क्रेटा कार जप्त करण्यात आली. या संपूर्ण रॅकेटचा तपास करताना पोलिसांनी आतापर्यंत १९ आरोपींना अटक केली आहे. त्यामध्ये सहा डॉक्टर, तीन मेडिकल चालक आणि वैद्यकीय साहित्याचा मोठा पुरवठादार यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्यात वापरण्यात येणारी एकूण पाच सोनोग्राफी मशिन विविध जिल्ह्यांमधून जप्त करण्यात आली आहेत. तसेच चार चारचाकी वाहनेही पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत. या कारवाईत श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल महादेव प्रकाश कोहक आणि संदीप पोपट राऊत यांनी विशेष परिश्रम घेतल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. या गंभीर आणि संवेदनशील गुन्ह्याचा पुढील तपास जिल्हा पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी भारती आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक आठरे करीत आहेत.

अवैध गर्भलिंग निदान आणि स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी सुरू असलेल्या या कारवाईमुळे राज्यभर कार्यरत अशा अनेक रॅकेट्सवर पोलिसांची करडी नजर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# व्यावसायिकाला धमक्या पोलिसांकडे तक्रार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील सराफ व्यावसायिक संदिप बबनराव महाले यांनी काही व्यक्तींकडून वारंवार त्रास दिला जात असल्याची तक्रार संगमनेर शहर पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. महाले यांनी दिलेल्या अर्जानुसार, त्यांचा पिढीजात सोने-चांदीचा व्यवसाय असून बाजारपेठेत ज्वेलर्सचे दुकान आहे. तसेच ते किरकोळ स्वरूपात जागा खरेदी-विक्रीचाही व्यवसाय करतात. काही व्यक्ती व्यवसाय मोठा असल्याचे सांगून पैशांची मागणी करतात तसेच यापूर्वी त्यांना लाखो रुपये दिल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

सदर व्यक्तींकडून स्वतःला व कुटुंबीयांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असून याबाबत विचारणा केल्यास शिवीगाळ व त्रास दिला जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करत महाले यांनी संबंधितांवर योग्य ती कारवाई करून संरक्षण देण्याची मागणी पोलिसांकडे केली आहे.


दैनिक युवावार्ता परिवार, संगमनेर

वाढदिवस शुभेच्छा



संदीप हासे

संचालक रेणुका पॅकेजिंग



रोहन वैद्य

आ. खताळ यांचे स्विय सहायक


# राष्ट्रवादीचं धक्कातंत्र, भुजबळांचा पत्ता कट

## राष्ट्रवादी काँग्रेसचा राज्यसभेसाठी उमेदवार जाहीर



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवाराच्या नावाची अधिकृत घोषणा केली. राष्ट्रवादीने भंडाऱ्याच्या राजेंद्र जैन यांच्या नावाची उमेदवार म्हणून घोषणा केली आहे. पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीनंतर उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात आली. सुनील तटकरे यांनी उमेदवाराची घोषणा केल्याने आता राज्यसभेच्या उमेदवारीचा सस्पेन्स संपला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीची आज रविवारी मुंबईत बैठक झाली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते बैठकीला उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीला राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, छगन भुजबळ, समीर भुजबळ, दिलीप वळसे पाटील आदी नेते उपस्थित होते. या बैठकीत राज्यसभा उमेदवारी कोणाला द्यायची, यावर बराच वेळ चर्चा झाली. छगन भुजबळ यांनी समीर भुजबळ यांना उमेदवारी देण्यात यावी, असं आग्रह बैठकीत घेतला होता.

दुसरीकडे राज्यसभेच्या जागेसाठी छगन भुजबळ यांच्या नावाबरोबरच बीडचे अमरसिंह पंडित, भंडाराचे राजेंद्र जैन यांच्या नावाचीही बैठकीत चर्चा झाली. छगन भुजबळ यांना राज्यसभेवर पाठवण्यासाठी पक्षातील वरिष्ठ नेते आग्रही होते. परंतु समीर भुजबळ यांना मंत्री करण्यास भाजप श्रेष्ठींकडून नकार आल्याची माहिती आहे. परंतु छगन भुजबळ यांनी समीर भुजबळ यांना मंत्री केले, तरच राज्यसभेवर जाणार असल्याची अट घातल्याने तिढा वाढला. पुढे बराच वेळ चर्चा झाल्यानंतर भंडाऱ्याचे राजेंद्र जैन यांचे नाव निश्चित केले. राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते सुनील तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना राजेंद्र जैन यांच्या नावाची उमेदवार म्हणून घोषणा केली. राजेंद्र जैन यांच्या नावाची घोषणा झाल्यानंतर छगन भुजबळ माध्यमांशी न बोलता निघून गेले. त्यांच्यासोबत समीर भुजबळ देखील तात्काळ देवगिरी बंगल्यावरून निघाले. त्याचबरोबर या राज्यसभेच्या उमेदवारीसाठी नवनीत राणा यांच्याही नावाची चर्चा होती. परंतु अंतिम क्षणी राजेंद्र जैन यांना उमेदवारी देण्यात आली.

# शेतकऱ्यांनो पेरणीची घाई नकोच!

## 15 जूनपर्यंत राज्यात मान्सूनची शक्यता कमीच



जिल्हा माहिती कार्यालय-

अहिल्यानगर - महाराष्ट्रात मॉन्सून दाखल झाल्याचे बोलले जात आहे. मात्र महाराष्ट्रात मॉन्सून जरी दाखल झाला असला तरीही मॉन्सूनच्या पावसाकरिता वाट पाहावी लागणार आहे. राज्यात जो पाऊस सुरू आहे तो अवकाळी पाऊस आहे. मॉन्सूनच्या पावसाला अद्याप सुरूवात झाली नाही. यादरम्यानच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाकडून मॉन्सूनबाबत मोठी माहिती देण्यात आली. किमान १५ जूनपर्यंत राज्यात सर्वत्र मान्सूनच्या पावसाची शक्यता कमी असल्याचे सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून सांगण्यात आले. मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे.

त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे. सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही.दरम्यान, किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खानदेशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे, अशी पोस्ट मुख्यमंत्री कार्यालयाकडून शेअर करण्यात आली. १५ जूनपर्यंत राज्यात पावसाची शक्यता कमी असल्याची माहिती आता थेट सीएमओ कार्यालयाकडून देण्यात आली आहे. मॉन्सूनचा वेग मंदावल्याचे बघायला मिळतंय. १५ जूनपर्यंत आता मॉन्सूनच्या पावसाकरिता वाट बघावी लागणार आहे. शेतकरी पेरणीकरिता मॉन्सूनच्या पावसाची वाट बघत आहेत. मात्र, आता पाऊस लांबणीवर पडल्याचे बघायला मिळत आहे.

# संगमनेरच्या सहकार चळवळीतील दीपस्तंभ कै. लक्ष्मणराव फटांगरे

## यांना प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भावपूर्ण आदरांजली




**किसन भाऊ हासे** (बी.जे.)

**संस्थापक-संपादक, दैनिक युवावार्ता**

कै. लक्ष्मणराव फटांगरे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्ताने विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रध्दांजली.

संगमनेर तालुका सहकारी शेतकी संघ ही सहकाराची मातृसंस्था आहे. या संस्थेतील अतिशय कर्तबगार मॅनेजर व आमचे व्याही लक्ष्मणराव फटांगरे यांचे १८ जून २०२५ रोजी निधन झाले. अतिशय कृतार्थ व समाधानी जीवन जगलेले लक्ष्मणराव फटांगरे साहेबांच्या असंख्य आठवणी मनात दाटल्या आहेत. कर्तबगार अधिकारी, प्रेमळ पिता आणि सदैव सहकार्याची तयारी असलेले सहृद व्यक्तिमत्त्व म्हणजे लक्ष्मणराव फटांगरे होय.

अकोले तालुक्यातील आंबड गावचे माझे साडूभाऊ पंढरीनाथ सजन भोर यांची कन्या प्रतिभा ही लक्ष्मणरावांचे चिरंजीव संदीपरावांना दिली आणि लक्ष्मणरावांचे स्नेही म्हणून असलेले ऋणानबंध सोयरे म्हणून झाले. जेव्हा कधी आमच्या भेटी व्हायच्या तेव्हा अतिशय प्रेमाने स्वागत करणार. आमची इच्छा असून-नसू चहाचा आग्रह ठरलेला असायचा. निष्कपट बोलणे, सरळ वागणे असलेले लक्ष्मणराव शेतकी संघात क्लार्कपासून स्वकर्तृत्वाने मॅनेजर झाले परंतू त्यांच्या वागण्या-बोलण्यात अहंकार कधी दिसला नाही. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरातांची सहकाराची शिस्त, व्यवहार, संस्था हितास त्यांनी कधीच धक्का लागून दिला नाही. सेवानिवृत्ती नंतरही चार वर्षे त्यांना संस्थेमध्ये आग्रहपूर्वक थांबवून सेवेची संधी दिली ही प्रामाणिकपणा आणि एकनिष्ठेची पावती आहे.

संगमनेर तालुक्यातील सारोळे पठार हे लक्ष्मणरावांचे मूळ गाव. वडिल सखाराम कृष्णाजी फटांगरे गावचे पोलिस पाटील होते. वडिलांनंतर सर्व गाव त्यांना लक्ष्मण पाटील म्हणूनच ओळखायचे. पन्नास वर्षांपूर्वीचा पठार भाग म्हणजे दुष्काळ, प्रतिकुलता, जगण्यातील चिवटपणा आणि विद्वत्ता असे चित्र असायचे. पावसाळ्यानंतर सहा महिने दुष्काळच असायचा. अशा काळात पठारातील हजारो व्यक्ती उदरनिर्वाहासाठी गावाबाहेर पडायचे. संगमनेरच्या मालदाड रोड परिसरात पठार भागातील नागरिकांची फार मोठी वसाहत आहे. त्यापैकी श्रमपरिहार सह. गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात लक्ष्मणरावांचा सिंहाचा वाटा होता. स्वत:च्या विकासाबरोबर इतरांचाही विकास झाला पाहिजे ही भावना त्यांची सतत असायची. या तळमळीतूनच त्यांनी डॉ. एम. डी. घुले, दिलीपराव लंके, मेजर रावजी भागुजी घुले, ॲड. सुदामराव आहेर, दत्तात्रय घुले, भाऊसाहेब म्हातारजी फटांगरे, पोलिस अधिकारी भालचंद्र पंढरीनाथ काकड, तुकाराम श्रीपद फटांगरे, डोंगरे साहेब, मेढे साहेब आदींना बरोबर घेवून डाळ मिल, मंगल कार्यालय, दुध चिलींग प्लँट यासारख्या संस्था उभ्या केल्या. प्रयत्न अतिशय चिवटपणे केले.पठारभागातील व्यक्तीने नोकरी व्यवसाय करावा म्हणून हजारो व्यक्तींना लक्ष्मण पाटलांनी मोकळेपणाने सहकार्य केले. लक्ष्मणराव फटांगरे साहेब जुन्या काळातील बी. कॉम. पदवीधर असल्याने, शिक्षणाचे महत्त्व जाणून असल्याने त्यांची मुले सौ. स्वाती अण्णासाहेब शिरोळे, उद्योजक इंजि. संदीपराव, इंजि. सचिनराव यांना उत्कृष्ट शिक्षण दिले. अतिशय चांगले संस्कार दिले. जीवनात प्रचंड संघर्ष केल्यानंतर जीवनसाथी अलकाताईबरोबर अतिशय सुखात, आनंदात संसार चालू असताना सौ. अलकाताईंचे २०१० साली अचानक निधन झाले. संसाराचा डाव अर्ध्यावर मोडला. पत्नीच्या निधनाने ते पूर्ण खचले मात्र चेहऱ्यावर ते कधीच दिसून दिले नाही. फार कणखरपणाने ते मुलांची आई व नातवंडांची आजी झाले. सर्व दु:खांचे क्षण पचवून सर्वांना आधार देत राहिले. मुलगी व जावई नाशिक येथे शिक्षकाच्या नोकरीनिमित्त स्थायिक झाले. सचिनरावांनी सिध्दी किराणा मॉलचा व्यवसाय यशस्वी केला. तर संदीपरावांनी फॅब्रिकेशन, लेझर कटिंग, पाऊडर कोटिंग, शेअरिंग, बेंडिंग अर्थातच इंजिनिअरींग क्षेत्रात गरूडझेप घेत २०० पेक्षाही जास्त व्यक्तींना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे रोजगार निर्माण करून दिला आहे. त्यांचे भागीदार ऋषीकेश मोंढे यांच्या खंबीर साथीने त्यांचा साई स्वामी हेक्सटेक आणि साई आशीर्वाद इंडस्ट्रिज हे व्यवसाय महाराष्ट्राबाहेरही विस्तारीत होत आहेत. मुलांच्या कर्तृत्वाचे लक्ष्मणरावांना खूप कौतुक होते. अभिमान होता.

सहकारातील भाऊसाहेब थोरातांची शिस्त, पठार भागातील सहकार्याची भावना व नात्यातील प्रेम मागे ठेवून आपल्या सर्वांचे स्नेही दिगंताच्या प्रवासास निघून गेले. त्यांच्या आठवणी सदैव आपल्यात राहतील. पुन्हा एकदा त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रध्दांजली.


" प्रथम पुण्यस्मरण "



सप्रेम नमस्कार वि.वि. आमचे परमपूज्य वडिल

**कै. लक्ष्मण सखाराम पा. फटांगरे**

यांचे

**प्रथम पुण्यस्मरण** (वर्षश्राद्ध)

मंगळवार दिनांक ०९/०६/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. करण्याचे योजिले आहे. तरी या पुण्यस्मरण कार्यक्रमास अगत्य येण्याचे करावे ही नम्र विनंती.

दु:खाच्या सागरात राहुनी<br>सर्वांना सुखी संसाराची<br>जाणीव दिली क्षणोक्षणी<br>आठवण तुमची येत राहिली.<br>तुमच्या पुर्व पुण्याईमुळे<br>आम्ही उभे आहोत.<br>सदा तुमची उणीव<br>आम्हाला भासत आहे.

- आपले विनीत -

श्री. हरिभाऊ गणपत फटांगरे (भाऊ)

| | |
|---|---|
| श्रीमती विमल सुदामराव पोखरकर (बहिण) | सौ. भिमाबाई आनंदा गुळवे (बहिण) |
| श्री. संदिप लक्ष्मण फटांगरे (मुलगा) | श्री. सचिन लक्ष्मण फटांगरे (मुलगा) |
| सौ. स्वाती आण्णासाहेब शिरोळे (मुलगी) | श्री. आण्णासाहेब नामदेव शिरोळे (जावई) |
| श्री. वसंत रखमा फटांगरे (भाऊ) | श्री. नानासाहेब फुलाजी फटांगरे (भाऊ) |
| श्री. बाळासाहेब रखमा फटांगरे (भाऊ) | श्री. लक्ष्मण फुलाजी फटांगरे (भाऊ) |
| श्री. अनिल रखमा फटांगरे (भाऊ) | श्री. गोविंद फुलाजी फटांगरे (भाऊ) |
| श्री. सुनिल भाऊसाहेब फटांगरे (भाऊ) | श्री. विजय भाऊसाहेब फटांगरे (भाऊ) |
| श्री. तुकाराम पंढरीनाथ फटांगरे (भाऊ) | श्री. राजेंद्र देवराम फटांगरे (भाऊ) |
| श्री. ज्ञानेश्वर पंढरीनाथ फटांगरे (भाऊ) | श्री. संजय देवराम फटांगरे (भाऊ) |
| श्री. सोपान पंढरीनाथ फटांगरे (भाऊ) | श्री. विठ्ठल देवराम फटांगरे (भाऊ) |
| श्री. प्रतिक हरिभाऊ फटांगरे (पुतणे) | श्री. सतिष हरिभाऊ फटांगरे (पुतणे) |
| चि. वरद संदिप फटांगरे (नातू) | चि. आवेश सचिन फटांगरे (नातू) |

**समस्त फटांगरे पाटील परिवार व आप्तेष्ट**

* ठिकाण *

**अमृता लॉन्स, घुलेवाडी**

संगमनेर कॉलेज समोर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर



टिप - ह.भ.प. गणेश महाराज वाघमारे यांचे किर्तन होईल.






दैनिक **युवावार्ता**

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

परिवर्तनाचा पुरस्कर्ता














# आ. अमोल खताळ यांच्या पाठपुराव्याने ९८ रुग्णांना कोटींची वैद्यकीय मदत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर मतदारसंघातील सर्वसामान्य, गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदतीचा मोठा दिलासा मिळावा म्हणून आमदार अमोल खताळ यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून मागील एका वर्षात ९८ रुग्णांना तब्बल १ कोटी रूपयांच्या आसपास वैद्यकीय अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे रूग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अत्यंत खर्चिक आणि गंभीर आजारांवरील उपचारांसाठी ही मदत मिळाल्याने अनेक कुटुंबांना आर्थिक आधार मिळाला आहे. या अर्थसहाय्यामध्ये रुग्णांना कर्करोग शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायलिसिस, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), गुडघ्याचे प्रत्यारोपण, नवजात शिशुंचे आजार, रस्ते अपघात तसेच इतर गंभीर आजारांच्या उपचारांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

> **आजारपणामुळे सर्वसामान्य कुटुंबांवर आर्थिक संकट येते. अशा परिस्थितीत आर्थिक अडचणीमुळे उपचारात अडथळा येऊ नये, यासाठी शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना वेळेत मदत मिळवून देण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. रुग्णसेवेच्या या कार्यात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे विशेष सहकार्य मिळत आहे.**
>
> **आ. अमोल खताळ, संगमनेर**

ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना शासनाच्या योजनांची माहिती नसते किंवा आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात अडचणी येतात. अशा वेळी आमदार खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात गरजेची सर्व प्रक्रिया वेगाने पूर्ण करून दिली जात आहे. यामुळे रुग्णांना वेळेत उपचार घेणे शक्य झाले आहे.

उपचाराअभावी कोणत्याही रुग्णाला त्रास सहन करावा लागू नये, यासाठी शासनामार्फत महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, आयुष्यमान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम किंवा धर्मादाय रुग्णालयांच्या योजनांचा लाभ नागरिकांना उपलब्ध करून दिला जात आहे. सर्व शासकीय योजनांचा लाभ जास्तीत जास्त गरजू नागरिकांपर्यंत पोहोचावा, यावर आमदार अमोल खताळ यांच्या सूचनेनुसार विशेष भर देण्यात येत आहे.

**गंभीर आजारामुळे कुटुंब आर्थिक संकटात सापडले असताना अनेक रुग्णांचे नातेवाईक मदतीच्या अपेक्षेने आमदार अमोल खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात येतात. येथे केवळ कागदपत्रांची पूर्तता केली जात नाही, तर कुटुंबीयांना मानसिक आधार आणि धीरही दिला जातो. त्यानंतर मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी आवश्यक प्रक्रिया व पाठपुरावा तात्काळ सुरू केला जातो. त्यामुळे अनेक गरजू रुग्णांना वेळेत आर्थिक मदत मिळून उपचाराचा मार्ग मोकळा झाला आहे. नागरिकांच्या अडचणींना तत्काळ प्रतिसाद देणारे लोकप्रतिनिधी म्हणून आमदार अमोल खताळ यांच्याविषयी लाभार्थी कुटुंबीय कृतज्ञता व्यक्त करीत आहेत.**

# अवैध दारू व्यवसायाविरोधात आ. लहामटे पती-पत्नीची कारवाई

## अनेक अड्ड्यांवर छापे



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यात अवैध दारूविक्रीच्या वाढत्या प्रमाणामुळे सामाजिक वातावरण बिघडत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असताना आमदार डॉ. किरण लहामटे यांनी स्वतः रस्त्यावर उतरून अवैध दारू व्यवसायाविरोधात धडक मोहीम हाती घेतली. पोलिस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून प्रभावी कारवाई होत नसल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार लहामटे आणि त्यांच्या पत्नी पुष्पा लहामटे यांनी मेहंदुरी, इंदोरी, निंबरळ, राजूर आणि अकोले परिसरातील अवैध दारूविक्री केंद्रांवर अचानक भेटी देत संबंधित यंत्रणांना कारवाईस भाग पाडले.

मागील काही दिवसांपासून तालुक्यातील विविध गावांमधून अवैध दारूविक्रीमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असल्याच्या तक्रारी आमदार लहामटे यांच्याकडे येत होत्या. विशेषतः महिलांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत दारूमुळे कुटुंबातील कर्ते पुरुष व युवक व्यसनाच्या आहारी जात असल्याची खंत व्यक्त केली होती. या तक्रारींची दखल घेत आमदार लहामटे यांनी संबंधित गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन परिस्थितीची पाहणी करण्याचा निर्णय घेतला.

### उत्पादन शुल्क विभागाचेही धाडसत्र

मेहंदुरी, इंदोरी आणि निंबरळ या गावांमध्ये अचानक धाड टाकत त्यांनी अवैध दारूविक्री सुरू असलेल्या ठिकाणांची पाहणी केली. यावेळी मोठ्या प्रमाणावर दारूसाठा आढळून आला. त्यानंतर तातडीने पोलिसांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. जप्त करण्यात आलेला दारूसाठा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. तसेच ग्रामपंचायत प्रशासनालाही गावांमधील अवैध दारू व्यवसायांविरोधात कठोर भूमिका घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी आमदार किरण लहामटे यांनी अवैध दारूविक्रेत्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा दिला. युवकांचे भवितव्य उद्ध्वस्त करणाऱ्या आणि समाजाचे स्वास्थ्य बिघडविणाऱ्या या व्यवसायांवर कायमस्वरूपी आळा बसला पाहिजे. संबंधित विभागांनी आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, एका लोकप्रतिनिधीला स्वतः रस्त्यावर उतरून अशा प्रकारच्या कारवाया कराव्या लागत असल्याने पोलिस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. नागरिकांमधून या विभागांनी अधिक सक्रिय होऊन अवैध दारू व्यवसायांविरोधात व्यापक मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे.

चास पिंपळदरीत उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई- याच पार्श्वभूमीवर कोतूळ परिसरातील चास पिंपळदरी येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध गावठी दारू निर्मिती व विक्रीविरोधात मोठी कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे विभागाच्या पथकाने छापा टाकून सुरू असलेला अवैध व्यवसाय उद्ध्वस्त केला. या कारवाईत पाच जणांना अटक करण्यात आली असून सुमारे ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त केलेल्या साहित्यामध्ये १२.३६ लिटर देशी दारू, १५० लिटर ताडी तसेच ११० लिटर रसायनाचा समावेश आहे. संबंधितांविरोधात उत्पादन शुल्क कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

अकोले तालुक्यात अवैध दारूविक्रीविरोधात सुरू झालेल्या या कारवायांमुळे दारू माफियांचे धाबे दणाणले असून ग्रामीण भागातील नागरिकांनी या मोहिमेचे स्वागत केले आहे. मात्र, अवैध दारू व्यवसाय पूर्णपणे हद्दपार करण्यासाठी सातत्यपूर्ण आणि कठोर कारवाईची गरज असल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे.






















दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25